## संक्षिप्त फौजदारी खटला क्र.९४९/२०२४ मधील नि.क्र.७ वरील आदेश

फिर्यादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये असे कथन केले आहे की, या प्रकरणातील धनादेश क्र.६८४९४५ हा आरोपीने फिर्यादीस दिनांक ११/०६/२०२४ रोजी दिलेला आहे. परंतु, सदरचा धनादेश अनादरित झाल्याने फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. तथापी, सदर फिर्यादीमध्ये टंकलेखन दोषामुळे धनादेशाचा दिनांक २३/०१/२०२४ असा नमुद झालेला आहे. वास्तविक, आरोपीने वादातील धनादेश फिर्यादीस दिनांक ११/०६/२०२४ रोजी दिलेला असल्यामुळे तशी दुरुस्ती फिर्यादमध्ये होणे गरजेचे आहे. सबब, उपरोक्त कारणास्तव सदरची दुरुस्ती मंजुर करण्यात यावी अशी विनंती फिर्यादीने केलेली आहे.

०२. फिर्यादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. या अनुषंगाने मुळ धनादेश क्र.६८४९४५ याचे अवलोकन केले असता, त्यावर दिनांक ११/०६/२०२४ असा उल्लेख केलेला आहे. अद्याप आरोपीविरुध्द आदेशिका जारी करण्याबाबतचा आदेश पारीत झालेला नाही. अशा परिस्थितीत, वादातील धनादेशासंदर्भात फिर्यादीमध्ये नमुद केलेली तारीख टंकलेखनाच्या दोषामुळे चुकीची नमुद केलेली दिसुन येते. सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे ती मंजुर करणे योग्य होणार आहे. सबब, खालील आदेश.

### आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला आहे.

२. फिर्यादी यांनी त्यांच्या फिर्यादमध्ये आवश्यक त्या ठिकाणी धनादेशाच्या दिनांकामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

३. फिर्यादी यांनी तशी दुरुस्ती आजपासुन १४ दिवसांत करावी व फिर्यादची दुरुस्त प्रत दाखल करावी.

सही/–

मिरज

**(वि. वि. खुळपे)**

दिनांक २३/१०/२०२४

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मिरज